# सौदा पावती करारनामा

सौदापावती करारनामा मौजे जळगांव शिवारातील, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव, टाऊन प्लॅनिंग स्किम नं.२ जळगांव व सब रजिस्ट्रेशन ऑफिस, जळगांव यांचे हद्दीतील, गणेश वाडीतील, ''लभोनी कमल व्हिला'' या रहिवाशी सदनिका सिस्टीमच्या इमारतीतील, ------- मजल्यावरील रहिवासी सदनिका नंबर ........ (..............) बाबतचा किंमत रुपये ....................../- अक्षरी रक्कम रुपये ----------------------------------मात्र चा आज दि. / /२०१९ रोजी लिहून दिला असे.

----------------------------
----------------------------
----------------------------
----------------------------

– लिहून घेणार

श्री.मेघश्याम बाबुराव पाटील
उ.व.५९, व्यवसाय–नोकरी
रा.गणेशवाडी, जळगांव
तालुका व जिल्हा जळगांव–४२५०१
PAN : AWYPP0014H

– लिहून देणार
(प्लॉट मालक)

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| **श्री.नरेंद्र निहालचंद जैन**<br>उ.व.४५, व्यवसाय-व्यापार<br>PAN : ADZPJ1376L<br>आधार कार्ड नं.९२३६ ८१२९ ५६१३<br>रा.जयकिसनवाडी, जळगांव,<br>ता.जि.जळगांव<br>(बिल्डर्स व डेव्हलपर्स स्वत:करीता व लिहून देणार प्लॉट मालक यांचे विकसन कामीचे जनरल मुखत्यार म्हणून) | **लिहून देणार (बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स)** |

कारणे सौदापावती करारनामा लिहून देतोत की,

त्या मिळकतीचे वर्णन :-

तुकडी जिल्हा जळगांव, पोट तुकडी तालुका जळगांव, सब रजिस्ट्रेशन ऑफिस, जळगांव पैकी मौजे जळगांव शिवाराती, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव, टाऊन प्लॅनिंग स्किम नंबर २ जळगांव यांचे हद्दीतील, गणेशवाडीतील (विभाग क्रमांक १/५९)

**जळगांव शेत सर्व्हे नंबर १७७/१७८अ/१७९अ/१७९ब/१७८ब/१/१७८ब/२/५३९** यात शेतजमिनीत मे.कलेक्टर साहेब, पूर्व खान्देश यांचे कडील नंबर : एल.एन.डी/एस.आर./८१ तारीख २८/०७/१९६१ चे हुकूमाप्रमाणे व त्यांनी मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे प्लॉटस पाडलेले आहेत. त्यापैकी:-

**प्लॉट नंबर २७ (सत्तावीस)** याची अदमासे लांबी रूंदी :- पुर्व बाजू ८५ फुट, पश्चिम बाजू ९० फुट, उत्तर बाजू ६० फुट, दखिण बाजू ६० फुट, यांसी चतु:सिमा:- पुर्वेस-प्लॉट नंबर ३०, पश्चिमेस-प्लॉट नंबर २६, उत्तरेस-प्लाॅट नंबर २८ व २९, दक्षिणेस-रस्ता व खुली जागा यांस टाऊन प्लॅनिंग स्किम नंबर २ जळगांव नुसार फायनल प्लॉट नंबर ५३१ दिलेला असून त्याचे एकूण क्षेत्र ४८७.७ चौरस मीटर आहे.

तद्नंतर लिहून देणार यांनी सदरचे प्लॉट जागेवर वाढीव क्षेत्राचे बांधकाम

Scanned by CamScanner

करणेकामी दिनांक २३/०८/२०१६ रोजी दस्त क्रमांक ३८९४/२०१६ नुसार श्री.विजयकुमार दिपचंद चोरडीया व उमेश रामविलास जोशी यांचेकडून मौजे मेहरूण शेत सर्व्हे नंबर २७७/१ब क्षेत्र ७५०० चौ.मी.सदर मिळकतीवर जळगांव शहर महानगरपालिका विकास आराखड्यात १५ मीटर रूंद डी.पी.रोड व गार्डनसाठी आरक्षण (रिझर्व) क्षेत्र चौ.मी.५५५५.०० चा ताबा देवून या आरक्षणाधीन मिळकतीच्या जळगांव शहर महानगरपालिकेस विनामूल्य हस्तांतरणाच्या मोबदल्यात जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांनी 'बी' व 'सी' झोन साठी डेव्हलपमेंट राईटस् सर्टीफिकेट नंबर ४१, तारीख ३०/०५/२०१४ अन्वये एकूण ४९९९.५० चौ.मी. 'बी' झोन क्षेत्र १४९९.८५ चौ.मी. व 'सी' झोन ३४९९.६५ चौ.मी.असा हस्तांतरणीय विकास हक्क (टी.डी.आर) मिळालेला आहे. यापैकी विजयकुमार दिपचंद चोरडीया यांचे मालकीतून 'बी' झोन टी.डी.आर.फक्त ९२.३४० चौ.मी.(९९४ चौरस फूट) एवढा टी.डी.आर.व उमेश रामविलास जोशी यांचे मालकीतून 'बी' झोन टी.डी.आर.फक्त १६६.२९० चौ.मी.(१७९०.०० चौरस फुट) एवढा टी.डी.आर.असा एकूणात २५८.६३ चौ.मी.(२७८४ चौरस फुट) खरेदी घेतलेला आहे.

तसेच सदर संपूर्ण प्लॉट जागेवर मा.आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचेकडील बांधकाम परवानगी पत्र क्रमांक : टी.पी./बी.पी./११६९ तारीख २९/१२/२०१६ नुसार इमारतीचा प्लॅन मंजूर करून घेतलेला आहे व त्यानुसार लिहून देणार प्लॉट मालक यांनी लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांना सदर प्लॉट मिळकतीवर विकास करून फ्लॅट सिस्टीमचे इमारत बांधणेसाठी विकसन करारनामा दिनांक १४/०७/२०१६ रोजी दस्त क्रमांक २३१७/२०१६ नुसार सह.दुय्यम निबंधक (वर्ग-२), जळगांव-३ यांचे कार्यालयात लिहून व नोंदवून दिलेला आहे तसेच त्या अनुषंगाने मुखत्यारपत्र सुध्दा दस्त क्रमांक २३१८/२०१६, तारीख १४/०७/२०१६ अन्वये लिहून व नोंदवून दिलेले आहे व

Scanned by CamScanner

सदरचे विकासन करारानुसार विकासाचे संपूर्ण हक्क व अधिकार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांना दिलेले आहेत. सदरचे विकासन कराराप्रमाणे बिल्डर्स व डेव्हलपर्स यांनी वर सविस्तर वर्णन केलेल्या प्लॉट जागेवर बेसमेंट (तळघर) फ्लोअर प्लॅन. ग्राऊंड (तळमजला) फ्लोअर प्लॅन, फर्स्ट (पहिला) फ्लोअर प्लॅन, सेकंड (दुसरा) फ्लोअर प्लॅन, थर्ड (तिसरा) फ्लोअर प्लॅन, फोर्थ(चार) फ्लोअर प्लॅन व फिफ्थ (पाच)फ्लोअर प्लॅन असे एकूण २० (वीस) फ्लॅट सिस्टीमचे घर जागेचे बांधकाम सुरू केलेले असून त्यास 'लभोनी–कमल व्हिला' असे नांव दिलेले आहे.

सदरची स्थावर मिळकतीपैकी, प्लॉट मालकांनी बिल्डर्स व डेव्हलपर्स यांना विकसन करार व मुखत्यारपत्रापोटी रूपये २०,००,०००/– अधिक दुसऱ्या मजल्यावरील अनुक्रमे रहिवाशी फ्लॅट (सदनिका) नंबर ५(पाच) अंदाजित बांधीव क्षेत्र ४१.०३५ (४४१.७० चौरस फुट), दुसऱ्या मजल्यावरील रहिवासी फ्लॅट (सदनिका) नंबर ६ (सहा) याचे अंदाजित बांधीव क्षेत्र ४१.०३५ (४४१.७० चौरस फुट), दुसऱ्या मजल्यावरील रहिवासी फ्लॅट (सदनिका) नंबर ७ (सात) याचे अंदाजित बांधीव क्षेत्र ४१.०३५ (४४१.७० चौरस फुट) आणि दुसऱ्या मजल्यावरील रहिवासी फ्लॅट (सदनिका) नंबर ८ (सहा) याचे अंदाजित बांधीव क्षेत्र ४१.०३५ (४४१.७० चौरस फुट) अशा रीतीने वर सविस्तर वर्णन केलेल्या संपूर्ण इमारतीतील संपूर्ण दुसरा मजल्यावरील फ्लॅटस स्थावर मिळकती लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांनी लिहून देणार प्लॉट मालक यांचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत व ताब्यात विकसन करारानुसार द्यावयाच्या आहेत व बाकी राहिलेल्या फ्लॅटस मिळकती पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नंबर्स १, २, ३, ४, तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर्स ९, १०, ११ व १२, चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर्स १३, १४, १५ व १६ व पाचव्या मजल्यावरील फ्लॅट नंबर्स १७, १८, १९ व २०

Scanned by CamScanner

तसेच भविष्यातील दक्षिणेकडील बेसमेंटमधील स्थावर मिळकती ह्या लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांनी घ्यावयाचे ठरलेले आहे. त्या संपूर्ण इमारतीतील बांधकामापैकी वर सविस्तर वर्णन केलेल्या प्लॉट मालक यांनी देवू केलेल्या फ्लॅट नंबर्स ५, ६, ७ व ८ च्या फ्लॅटस मिळकती सोडून शिल्लक राहिलेल्या फ्लॅटस मिळकतीपैकी:-

--------- मजल्यावरील फ्लॅट नंबर ........ (.............) याचे एकूण बांधीव क्षेत्र ४१.०३५ चौरस मीटर (४४१.७० चौरस फुट) राहावयाचे आहे. यांत एक लिव्हींग रूम, एक टॉयलेट, किचन रूम, एक मास्टर बेडरूम बाल्कनीसह असे बांधकाम राहावयाचे आहे. सदर फ्लॅट जागेचे चटई (कारपेट) क्षेत्र ३६.९८० चौरस मीटर राहावयाचे आहे. सदर फ्लॅट जागेत इलेक्ट्रीक फिटींग व नळ फिटींग करून द्यावयाची आहे. मात्र त्यास लागणारे इलेक्ट्रीक मीटर कनेक्शन तुम्ही तुमचे स्वखर्चाने घ्यावयाचे आहे. तसेच सदरचे इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांसाठी सामाईकात सोयी व सुविधा दिलेल्या असून त्यात उपरोक्त फ्लॅट जागेचा अविभाज्य हिस्सा राहावयाचा आहे. सदर फ्लॅट मिळकतीच्या चतु:सिमा:- पुर्वेस------ --------------, पश्चिमेस---------------------- उत्तरेस---------------------- दक्षिणेस------------- ---------

येणे प्रमाणे वर सविस्तर वर्णन केलेली चतु:सिमेतील फ्लॅट घर जागा, आतील दरवाजे, खिडक्या, इलेक्ट्रीक फिटींग, नळ फिटींग तसेच सामाईक सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे मालकी व वापर हक्कांसह व तदंगभूत वस्तुंसह. आम्ही तुम्हास रूपये ........................ अक्षरी रूपये ------------- --------------- वर कायमस्वरूपी पूर्ण मालकीहक्काने खुश खरेदी देवून तुमचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीत व ताब्यात देण्याचा सौदा आज रोजी पक्का

Scanned by CamScanner

केला. सदरची फ्लॅट घर जागा, सामाईक सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे मालकी व वापर हक्कासहचा सोईकरीता 'सदर फ्लॅट मिळकत' म्हणून खाली संबोधीत केलेली आहे. त्या फ्लॅट मिळकतींबाबतच्या भरण्याचा व शर्तीचा तपशिल :-

......................./- अक्षरी रूपये ---------------------- मात्र आज सौदापावती करारावर सह्या करण्यापुर्वी नगदी रोख बयाणा म्हणून मिळाले. ते खरेदीखतात मजरा करून देऊ.

......................./- अक्षरी रूपये ---------------------- मात्रचा तुम्ही आम्हाला -------------------------- ---- शाखेचा चेक नंबर.......................... दि. / / २०१९ रोजीचा दिला, ते खरेदीखतात मजरा करून देऊ,

......................./- अक्षरी रूपये ---------------------- मात्र तुम्ही आम्हास तारीख / /२०२० चे दिवशी किंवा त्याआधी खरेदीखत लिहून व नोंदवून देण्यापुर्वी चेकने द्यावयाचे आहे.

......................./- अक्षरी रूपये ---------------------- मात्र.

येणे प्रमाणे सौदा ठरला, त्या सौद्याच्या अटी व शर्ती:-

१) सदर सविस्तर वर्णन केलेली फ्लॅट मिळकत मे.जिल्हाधिकारी सो. जिल्हा जळगांव, शहर महानगरपालिका जळगांव, सब-रजिस्ट्रेशन ऑफिस जळगांव, टाऊन प्लॅनिंग जळगांव यांचे हद्दीतील आहे. सबब त्यांचेकडील हुकूमातील नियम, अटी व शर्ती खरेदीखतानंतर मालक व कब्जेदार म्हणून तुमचेवर बंधनकारक राहतील.

Scanned by CamScanner

२) सदर फ्लॅट मिळकतीचा उपभोग तुम्ही इतर फ्लॅट धारकांना त्रास होणार नाही अशा रितीने रहिवासासाठीच करावयाचा आहे. तसेच सदर फ्लॅट सिस्टीमचे इमारतीस धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य तुम्हास करता येणार नाही. तसेच सदर इमारतीचा बाह्य शो व डिसेन्सी तसेच मुळ स्ट्रक्चर यात बदल होईल असे कोणतेही फेरबदल तुम्हास करता येणार नाही.

३) सदर फ्लॅट सिस्टीम इमारतीचे तळजमिनीत तुमचे फ्लॅट जागेचा अविभाज्य हिस्सा आहे व तो तुम्हास कधीही विभागून मागता येणार नाही.

४) सदर 'लभोनी–कमल व्हिला' साठी असलेल्या सामाईक सुखसोईचे दुरूस्ती, सुधार, बिघाड, मेन्टेनन्ससाठी द्यावा लागणारा सामाईकातील खर्च तुम्ही हिस्सेराशीने वेळचेवेळी सदरचे असोसिएशनला द्यावयाचा आहे व सदर इमारतीतील सामाईक सुखसोई चालू व सुस्थितीत ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी तुम्ही व इमारतीतील इतर फ्लॅट धारकांवर आहे व राहील.

५) सदर फ्लॅट मिळकतीबाबतचे बिनशेती कर, महानगरपालिका कर, शासकीय व निमशासकीय कर खरेदीखतापावेतोचा आम्ही लिहून देणार यांनी भरावयाचे असून खरेदीखतानंतर येणारे वरील कर मालक व कब्जेदार म्हणून तुम्ही भरावयाचे आहे.

६) सदर उपरोक्त फ्लॅट जागेचे खरेदीखत आम्ही तुम्हांस तारीख / / २०२० चे दिवशी किंवा त्याआधी तुमचेपासून भरण्यात नमूद केल्याप्रमाणेची संपूर्ण रक्कम आम्हास मिळालेनंतर तुमचे नावाने किंवा तुम्ही सांगाल त्या एक अगर अनेक इसमांचे नावाने लिहून व नोंदवून देवू व त्याच दिवशी सदर फ्लॅट जागेचा प्रत्यक्ष कब्जा तुम्हास देवू.

Scanned by CamScanner

७) सदर मुदतीत आम्ही लिहून देणार यांनी तुम्ही लिहून घेणार यांना सदरची फ्लॅट (सदनिका) मिळकत संपूर्णपणे पूर्ण करून देवून, तुमचे प्रत्यक्ष मालकीत, कब्जात व ताब्यात खरेदीखताने द्यावयाचे आहे.

८) सदर **'लभोनी-कमल व्हिला'** या इमारतीतील सर्व धारकांसाठी सामाईकात एक इलेक्ट्रीक मीटर कनेक्शन जसे-सामाईक वापराची जागा, पार्कींग, जिना वगैरे ठिकाणी दिवे लावणेकामी, तसेच लिफ्टचे वापरासाठी दिलेले आहे. सबब सदरचे सामाईकात दिलेल्या इलेक्ट्रीक मीटरचे बील इमारतीतील सर्व धारकांनी मिळून हिस्सेराशीने भरावयाचे आहे व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांवर आहे व राहील.

९) सदरच्या वर सविस्तर वर्णन केलल्या मिळकतीस खरेदीखताच्या तारखेच्या आधीपावेतो तुम्ही लिहून घेणार दुसऱ्या कोणासही कोणत्याही रक्कमेस खरेदी देण्याचा सौदा करू शकतात व त्यापोटी येणारी रक्कम स्विकारू शकतात, त्यास लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स म्हणून माझी संमती असेल व त्या सौदापावती करारावर मी तुम्हास संमती देणार म्हणून सही देईल व सदरच्या रहिवाशी सदनिका मिळकत लिहून घेणार यांच्या नावाने लिहून व नोंदवून देईल.

१०) लिहून घेणार यांना 'लभोनी-कमल व्हिला' या प्रस्तावित इमारतीच्या भविष्यातील सामुहिक व सामाईक देखरेख, देखभाल व इतर लागणाऱ्या खर्चासाठी एक रकमी देखभाल व दुरूस्ती खर्च म्हणून प्रत्येक रहिवाशी सदनिका धारकास **'लभोनी-कमल व्हिला'** सोसायटीच्या नावाने **एक लाख पन्नास मात्र** ना परतावा रक्कम म्हणून जमा करणे हे प्रत्येक रहिवाशी सदनिकास बंधनकारक असेल. सदरची रक्कम रहिवाशी सदनिका

Scanned by CamScanner

लिहून घेणार यांना सदर मिळकतीचे खरेदीखत नोंदवून देण्यापूर्वी लिहून देणार यांच्या ताब्यात देणे बंधनकारक असेल. त्याशिवाय कोणत्याही सबबीवर सदरचे खरेदीखत नोंदविले जाणार नाही.

११) सदर **'लभोनी-कमल व्हिला'** सोसायटीतील सदनिका ही शुध्द शाकाहारी निर्व्यसनी व सदर सोसायटीतील इतर सदस्यांना त्रास होणार नाही अश्या परिवारास देणे बंधनकारक असेल, त्यास सर्व सोसायटी सदस्यांची सहमती घेणे आवश्यक असेल.

१२) सदर **'लभोनी-कमल व्हिला'** या इमारतीसाठी आज रोजी मंजूर नकाशात संपूर्ण तळमजला तसेच बेसमेंट मजला हा पार्कींग म्हणून दाखविलेला आहे. परंतु भविष्यात मी लिहून देणार यांना दक्षिणेकडील रोडालगतच्या बाजूची बेसमेंटची जागा इमारतीचे कम्प्लीशन नंतर कायदेशीर हक्काने योग्य त्या अधिकाऱ्याकडून पार्कींग म्हणून न ठेवता वापरासाठी मंजूर केल्यास तेवढी जागा मात्र मी लिहून देणार यांचे मालकीची व कब्जे उपभोगातील राहील व ती बेसमेंटमधील मला कायद्याने मिळालेली बेसमेंट जागा मला त्रयस्थ इसमांना विक्री करण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार राहील.

१३) सदर **'लभोनी-कमल व्हिला'** या इमारतीची गच्ची मी लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांचेच मालकीची व कब्जे उपभोगातील आहे व राहील. तसेच सदर गच्चीचा वापर लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांना योग्य वाटेल त्या रितीने करण्याचा संपूर्ण हक्क, अधिकार आहे व राहील. सबब सदर बाबत तुम्हांस व इमारतीतील इतर फ्लॅट धारकांना काही एक हिला हरकत अगर अडी अडचण सांगता अगर मागता येणार

Scanned by CamScanner

१४) सदर **'लभोनी–कमल व्हिला'** या इमारतीस आज रोजी उपलब्ध असलेल्या एफ.एस.आय.१,६४५ म्हणजेच ८०३.४६ चौ.मी.क्षेत्राचा एफ.एस.आय.मी लिहून देणार यांनी वापराचा आहे व भविष्यात काही एक एफ.एस.आय.कायद्याच्या तरतुदीनुसार मिळाल्यास किंवा शिल्लक राहिल्यास त्याची संपूर्ण मालकी व कब्जा मी लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांचीच राहावयाची आहे. सबब त्यानुसार सदर इमारतीचे गचचीवर बांधकाम करण्याचा व ते बांधकाम खरेदी घेणारे इसमांना तबदील करण्याचा हक्क व अधिकार मी लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांनाच आहे व राहील. तसेच सदर इमारतीचे गच्चीवर भविष्यात बांधले जाणारे फ्लॅट धारकांना सदर इमारतीसाठी असलेल्या सामाईक सुखसोईचा उपभोग घेण्याचा हक्क व अधिकार राहावयाचा आहे व राहील. तसेच सदर इमारतीचे गच्चीवरील बांधकामासाठी आवश्यक ते सर्व प्रकारचे सहकार्य तुम्हास द्यावे लागेल. सबब सदर बाबत तुम्हास काही एक अडी अडचण अगर हिला हरकत घेता येणार नाही.

१५) सदर **'लभोनी–कमल व्हिला'** या इमारतीतील फ्लॅट धारकांसाठी मी लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांनी लिफ्टची व त्यास अनुसरून इन्व्हर्टर बॅटरी बॅक अपसहची व्यवस्था करून द्यावयाची आहे. सबब सदर लिफ्ट कामी येणारा सुधार, बिघाड, दुरूस्ती खर्च तसेच इन्व्हर्टर बॅटरी बॅकअपचे मेंटेनन्सचा खर्च वगैरे इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांनी सामाईकात हिस्सेराशीने करावयाचा आहे. सबब त्याबाबत काही एक जबाबदारी मी लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांचेवर नाही व पुढेही राहणार नाही.

Scanned by CamScanner

१६) सदर प्लॉट जागेवर मी लिहून देणार बिल्डर्स व डेव्हलपर्स यांनी बहुमजली फ्लॅट घर जागेचे बांधकाम सुरू केलेले आहे व त्यास **'लभोनी-कमल व्हिला'** असे नांव दिलेले आहे व सदर फ्लॅट सिस्टीमचे इमारतीबाबतचे घोषणापत्र (Deed of Declaration) आम्ही लिहून व नोंदवून देणार आहोत. त्यानंतर तसेच सदर **'लभोनी-कमल व्हिला'** साठी अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन स्थापन व्हावयाची असून व त्यात तुम्हास सभासद व्हावे लागेल व सदर असोसिएशनचे सर्व नियम, अटी व शर्ती तम्हास खरेदीखतानंतर मालक व कब्जेदार म्हणून तुमचेवर बंधनकारक राहतील. तसेच असोसिएशनने ठरविल्याप्रमाणे सामाईक सुखसोईंसाठी लागणारा खर्च देणे तुमचेवर बंधनकारक राहील.

१७) सदरची फ्लॅट मिळकत पूर्ण झालेनंतर व लिहून देणार यांना संपूर्ण रक्कम मिळालेवर अवलोकन करावयाची आहे व त्याकामी अवलोकन केल्यानंतर सदर फ्लॅट मिळकत सुस्थितीत असल्याची तुमची खात्री झाल्यावर सदर फ्लॅट मिळकतीचे खरेदीखत लिहून नोंदविले जाईल व त्यानंतर मात्र सदर फ्लॅट मिळकतीचे खरेदीखत लिहून नोंदविले जाईल व त्यानंतर मात्र सदर फ्लॅट मिळकतीत कोणत्याही प्रकारची दुरूस्ती करावी लागल्यास किंवा लिकेज-ब्रेकेज याकामी येणारा संपूर्ण खर्च तुम्ही लिहून घेणार यांनीच करावयाचा आहे. त्याबाबतची कोणतीही जबाबदारी लिहून देणार यांचेवर नाही व पुढेही राहणार नाही.

१८) सदर सौदेपावतीसाठी व पुढे येणारे खरेदीखतासाठी लागणारा संपूर्ण खर्च जसे, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, कॉम्प्युटर व झेरॉक्स चार्जेस व इतर अनुषंगीक खर्च तसेच सदर इमारतीचे घोषणापत्रासाठी येणारा

Scanned by CamScanner

सामाईकातील खर्च वगेरे तुम्ही लिहून घेणार यांनीच करावयाचा आहे.

१९) सदरचा सौदापावती करारनामा मी लिहून देणार व माझे पश्चात माझे वंश वालीवारस वगैरे यांचेवर तसेच तुम्ही लिहून घेणार व तुमचे पश्चात तुमचे वंशवाली वारस वगेरे यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

२०) सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीच्या किंमतीत सर्व्हीस टॅक्स, वॅट टॅक्स, उपकर वा अन्य कोणतेही तत्सम टॅक्सेस अंतर्भूत नाहीत. सबब वरील प्रमाणेचे काही एक टॅक्सेस भरावे लागल्यास ते भरण्याची सर्वस्वी जबाबदारी तुम्ही लिहून घेणार यांचीच आहे व त्याबाबतचे कराची रक्कम खरेदीखत लिहून व नोंदवून देण्यापूर्वी मी लिहून देणार यांचेकडे रोखीने/चेकने जमा करणे लिहून घेणार यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

येणे प्रमाणे तुमचेपासून वर नमूद केल्याप्रमाणेची रक्कम मिळाली. हा सौदेपावती करारनामा राजीखुशीने स्वसंतोषाने समजून उमजून वाचून घेवून उभय साक्षीदारांसमक्ष सह्या करून आज तारीख ........ माहे........... सन २०१९ च्या दिवशी जळगांव मुक्कामी लिहून दिले असे.

------------------------

श्री.नरेंद्र निहालचंद जैन
बिल्डर्स व डेव्हलपर्स स्वत:करीता व
लिहून देणार–प्लॉट मालक यांचे विकसन
कामीचे जनरल मुखत्यार म्हणून
लिहून देणार

Scanned by CamScanner